उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

नाशिक शहर वर्ष ६८, अंक २१९ सोमवार, १४ मे २००७ किंमत २.५० पाने १४



# होमिओपॅथीबाबतचे गैरसमज दूर होणे गरजेचे

## डॉ. अमरसिंह निकम यांचे प्रतिपादन

नाशिक (वार्ताहर) - होमिओपॅथीबाबत समाजात अनेक गैरसमज पसरविण्यात आले आहे. हे गैरसमज दूर करून या पॅथीबाबत जनजागृती घडवून आणण्याची जबाबदारी या क्षेत्रातील वैद्यकीय व्यावसायिकांची असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध होमिओपॅथीतज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम (पुणे) यांनी केले.

नाशिक होमिओपॅथीक डॉक्टर्स असोसिएशनतर्फे गंजमाळ येथील रोटरी सभागृहात झालेल्या 'होमिओपॅथी : समज-गैरसमज' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. सुनील घोडके होते.

डॉ. निकम पुढे म्हणाले की, होमिओपॅथी जुन्या आजारांबाबत परिणामकारक ठरत नाही. गंभीर आजार या पॅथीने बरा करता येत नाही असे अनेक गैरसमज समाजात पसरविण्यात आले आहे. त्यामुळे लोकांचा या पॅथीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. वास्तविक होमिओपॅथीद्वारे कितीतरी गंभीर आजार बरे करता येतात. दीर्घ आजारांवरही होमिओपॅथीकडे रामबाण उपाय आहेत.



नाशिक होमिओपॅथीक असोसिएशनतर्फे आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना डॉ. अमरसिंह निकम. समवेत डॉ. नीलेश जाधव, डॉ. राजेंद्र मंडलेचा, डॉ. सुनील घोडके आदी.

आधुनिक जीवनशैली माणसाचे आरोग्य बिघडविण्यात हातभार लावत असल्याचे सांगून ते म्हणाले की, अति आहारामुळे वजन अवास्तव वाढते. अति उपवास केल्याने वा अधिक काळ उपाशी राहिल्यामुळे वजनात मोठ्या प्रमाणात घट होते. या दोघांचा सुवर्णमध्य साधल्यास आरोग्य अबाधित राहते. समाजात वाढणाऱ्या चंगळवादामुळेही आजारांचे प्रमाण वाढत आहे. यासाठी भारतीय संस्कृतीतील नीतीमूल्यांची जपणूक होणे आवश्यक आहे.

डॉ. धनंजय आहिरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अजय वाळके यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास डॉ. नीलेश जाधव, डॉ. राजेंद्र मंडलेचा, डॉ. सुरेश पाटील, डॉ. ढाकीफळे, डॉ. अशोक औताडे, दुष्यंत दाधीच, डॉ. जगदीश वाणी, डॉ. गुजराथी, डॉ. राजश्री खर्डे, डॉ. प्रशांत आहेर आदी उपस्थित होते.

### दिशा निर्मित बीड वर्क व

नाशिक (वार्ताहर) - यंदाच दहा
डिझायनर होण्याचे स्वप्न मनोमन
करून बनवलेल्या विविध वस्तूंचे प्र
आयोजित करण्यात आले आहे.
शोरूमशेजारी हे प्रदर्शन होणार आ
कामे, त्याची मांडणी हे बघून स्वत